महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

(स्वायत्त) (ISO 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)

अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान पदविका

शिक्षण पुस्तिका

(Learning Material)

कंट्रोल सिस्टिम्स

CONTROL SYSYEMS

(314337)

यंत्र अभियांत्रिकी गट

मराठी – इंग्रजी (द्विभाषिक) माध्यम

(अभियांत्रिकी व तंत्रज्ञान चौथे सत्र पदविका)

MAHARASHTRA STATE BOARD OF TECHNICAL EDUCATION MUMBAI

शिक्षण पुस्तिका

Learning Material

कंट्रोल सिस्टिम्स

Control Systems

(314337)

मराठी-इंग्रजी द्विभाषिक माध्यम

(अभियांत्रिकी व तंत्राज्ञानातील चौथे सत्र पदविका)

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

(स्वायत्त) (ISO 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)

एम. एस. बी. टी. ई.
मार्गदर्शक

श्री. एस. एस. हरीप

निवड श्रेणी अधिव्याख्याता, यांत्रिकी अभियांत्रिकी

संकलक

श्री. एम.एस. दुकळे

अधिव्याख्याता, यांत्रिकी अभियांत्रिकी

श्री. के.एच. बोरसे

अधिव्याख्याता, मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकी

कु. पी. जी. देशमुख

अधिव्याख्याता, अनुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी

श्री. एस.एल.कुटे

अधिव्याख्याता, मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकी

श्री. व्ही.ई. कोठावदे

अधिव्याख्याता, यांत्रिकी अभियांत्रिकी

समीक्षक

श्री. वाय. बी. गायधनी

अधिव्याख्याता, यांत्रिकी अभियांत्रिकी

मुख्य समन्वयक

श्री. पी. टी.कडवे

प्राचार्य

संस्था समन्वयक

श्री. जे. टी. डेर्ले

अधिव्याख्याता, यांत्रिकी अभियांत्रिकी

MAHARASHTRA STATE BOARD OF TECHNICAL EDUCATION
MUMBAI

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(**स्वायत्त**) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IES: २७००१-२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१७० / १६१

Email : director@msbte.com Web : www.msbte.org.in

प्रास्ताविक

महाराष्ट्र राज्यातील पदविका स्तरावरील तंत्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचे रोजगार कौशल्य विकसित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याकरिता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ कटिबद्ध आहे. उद्योगधंद्यातील बदलत्या तंत्रज्ञानाशी संबंधित गरजा लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून पदविका अभ्यासक्रम वेळोवेळी अद्यावत करण्यात येतो . अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम शिकत असतांना संकल्पनात्मक ज्ञान, सुसंगत संदर्भ, प्रश्न विचारणे, विश्वसनिय पुरावे, कारणमीमांसा आणि सुस्पष्ट निकष यांचा वापर करून अर्थाची उकल करण्याची, विश्लेषण व मूल्यमापन करण्याची तसेच तर्काने अनुमान काढण्याची क्षमता म्हणजेच चिकित्सक विचार विद्यार्थ्यांमध्ये अधिक दृढ होतील असा मला विश्वास आहे. जेव्हा विद्यार्थी ज्ञान मिळवण्याच्या माध्यमाशी पूर्णपणे परिचित आणि सोयीस्कर असतात, तेव्हा त्यांच्यासाठी वर्गातील चर्चेत भाग घेणे सोपे होते, संकल्पनात्मक व सैद्धांतिक बाबींचे आकलन परिपूर्ण होते, संज्ञानात्मक क्षमता सुधारते आणि त्यांचा आत्मविश्वास देखील वाढतो या सर्व गोष्टींचा विचार करून मंडळाकडून शैक्षणिक सामुग्रीची निर्मिती करण्यात आलेली आहे . भारत देश हा खेड्यापाड्यातून विकसित झालेला देश असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण घेतांना भाषेचा अडसर न येता तांत्रिक बाबींचा आशय समजून घेणे शक्य होईल या दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने पदविका स्तरावरील तांत्रिक शिक्षणाकरीता विद्यार्थ्यांना मराठी-इंग्रजी द्विभाषिक माध्यमाचा पर्याय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून उपलब्ध करून दिलेला आहे .

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० प्रादेशिक भाषेतील शिक्षणास प्रोत्साहन देते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक अभ्यासक्रमांसाठी प्रादेशिक भाषांतुन शिक्षणाचे माध्यम निवडता येते. सदर धोरणामुळे प्रादेशिक भाषांमध्ये तांत्रिक सामग्री आणि अभ्यास सामग्रीचा विकास आणि भाषांतर निर्माण करण्याची आवश्यकता आहे . त्यास अनुसरून मंडळाने मराठी-इंग्रजी द्विभाषिक माध्यमाचा पर्याय द्वितीय व तृतीय वर्षाकरिताही उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच त्याकरिताची शैक्षणिक सामग्रीही संबंधीत भागधारकरांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

पदविका स्तरावरील तंत्रशिक्षण अधिक दर्जेदार करण्यासाठी महाराष्ट्रातील अनुभवी व तज्ञ अध्यापकांनी व्यवहारिक मराठी भाषा व इंग्रजी भाषेतील तांत्रिक शब्दावली यांचा वापर करून मराठी - इंग्रजी भाषेचा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मंडळाच्या स्तरावर गठीत सुकाणू समितीमार्फत सदर शैक्षणिक सामुग्रीचा दर्जा, तसेच इतर बाबींची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शैक्षणिक सामुग्री अधिक सम्पन्न झालेली असून विद्यार्थी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सुसंवादी आणि सर्वांगीण विकास साधतील. परिणामतः विश्वस्तरीय मनुष्यबळाच्या गरजा पूर्ण करण्यात महाराष्ट्र राज्य अग्रेसर राहील व पर्यायाने राष्ट्रनिर्मिती करीता निश्चितच हातभार लागेल , असा मला विश्वास आहे.

अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील प्रमुख विषयांची मराठी-इंग्रजी द्विभाषिक शैक्षणिक सामुग्री बनविण्यासाठी अध्यापक व सुकाणू समितीचे सदस्य यांनी दर्शविलेले समर्पण व वचनबद्धता कौतुकास पात्र आहे , या सर्वांचे मी मनः पूवक अभिनंदन करतो !

(प्रमोद नाईक)
संचालक
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

अनुक्रमाणिका

Sr. No	Unit Name	Page No
1	Overview of Control Systems ओवरव्ह्यू ऑफ कंट्रोल सिस्टिम्स	1
2	Time Domain Analysis टाइम डोमेन अनॅलिसिस	15
3	Stability Analysis स्टॅबिलिटी अनॅलिसिस	42
4	Process Controllers and Control Actions प्रोसेस कंट्रोल अँड कंट्रोल ऍक्शन्स	55
5	Servo System and Components सर्वो सिस्टिम आणि घटक	71

Unit 1 Overview of Control Systems
ओवरव्ह्यू ऑफ कंट्रोल सिस्टिम्स

विषय निष्पत्ती (CO): कंट्रोल सिस्टिमचे प्रकार समजून घेणे.

घटक निष्पत्ती (Theory Learning Outcomes):

TLO 1.1 दिलेली कंट्रोल सिस्टिम ओळखा.

TLO 1.2 कंट्रोल सिस्टिमच्या विविध प्रकारांमध्ये फरक करा.

TLO 1.3 दिलेल्या कंट्रोल सिस्टिम चे ट्रान्सफर फंक्शन काढणे

TLO 1.4 ब्लॉक डायग्राम रिडक्शन नियम वापरून दिलेल्या सिस्टिमचे ट्रान्सफर फंक्शन ऑप्टिमाइझ करा.

1.1 कंट्रोल सिस्टीम:

सिस्टिम म्हणजे विविध भौतिक घटकांची योग्य प्रकारे जोडलेली अशी व्यवस्था जेणेकरून एक संपूर्ण युनिट तयार होईल आणि कार्य करू शकेन.

कंट्रोल सिस्टीम म्हणजे योग्य प्रकारे जोडलेल्या भौतिक घटकांचे एक संपूर्ण युनिट जे स्वतःला किंवा दुसऱ्या सिस्टीमला कमांड देऊ शकेन किंवा नियमन करू शकेन.

1.1.1 कंट्रोल सिस्टीमचे घटक:

टेबल 1.1

कंट्रोल सिस्टीमचे घटक (उदाहरण: तापमान कंट्रोल सिस्टीम)

घटक	व्याख्या
रेफरन्स इनपुट	क्लोज्ड लूप सिस्टीममध्ये तुलनेसाठी वापरला जाणारा स्टँडर्ड सिग्नल. उदा. इनपुट: इच्छित तापमान.
ॲक्च्युएटिंग सिग्नल	फीडबॅक सिग्नल आणि रेफरन्स सिग्नल मधील फरकाला ॲक्च्युएटिंग सिग्नल म्हणतात. उदा. हीटिंग एलिमेंट.
कंट्रोल घटक / कंट्रोलर	कंट्रोल इनपुट (डिझायर्ड व्हॅल्यू) ची वास्तविक आउटपुटशी तुलना करतो आणि कोणतीही त्रुटी दुरुस्त करण्यासाठी कंट्रोल सिग्नल तयार करतो. उदा. थर्मोस्टॅट.
प्लांट / प्रक्रिया	सिस्टिम किंवा प्रक्रिया नियंत्रित केली जात असतांना, जिथे नियंत्रण सिग्नल प्राप्त करते आणि आउटपुट तयार करते. उदा. हीटर.
कंट्रोल्ड व्हेरिएबल	कंट्रोल सिस्टिमचे प्रमाण किंवा स्थिती जी थेट मोजली जाऊ शकते आणि नियंत्रित केली जाऊ शकते त्याला कंट्रोल्ड व्हेरिएबल म्हणतात. उदा. प्रत्यक्ष खोलीचे तापमान
डिस्टर्बन्स	सिस्टिमच्या कार्यक्षमतेवर परिणाम करणारा रेफरन्स वगळता इतर कोणत्याही सिग्नलला डिस्टर्बन्स म्हणतात. उदा. उघड्या खिडक्या किंवा सूर्यप्रकाश यासारख्या वातावरणातून उष्णता कमी किंवा जास्त होणे.
फीडबॅक	फीडबॅक म्हणजे सिस्टिमचे आउटपुट मोजण्याची आणि इनपुटशी तुलना करण्यासाठी कंट्रोलरकडे परत पाठविण्याची प्रक्रिया. उदा. तापमान सेन्सर.
सिस्टिम एरर	ॲक्च्युअल व्हॅल्यू आणि आयडिअल व्हॅल्यू यांच्यातील फरकाला सिस्टिम एरर म्हणतात. उदा. निर्धारित तापमान आणि प्रत्यक्ष तापमान यांच्यातील फरक.



Fig. 1.1
कंट्रोल सिस्टिम ब्लॉक डायग्राम

1.1.2 कंट्रोल सिस्टिमची उदाहरणे: ॲप्लिकेशन्स:

1. ऑटोमोबाईलचे स्टीअरिंग कंट्रोल.
2. औद्योगिक शिलाई मशीन.
3. सोलर कलेक्टर चे सन-ट्रॅकिंग कंट्रोल.
4. गती नियंत्रण प्रणाली.
5. विद्युत भट्टीचे तापमान नियंत्रण.

1.2 कंट्रोल सिस्टिमचे प्रकार:

1.2.1 **ओपन-लूप कंट्रोल सिस्टिम:** ज्या कंट्रोल सिस्टिममध्ये नियंत्रण क्रिया सिस्टिमच्या आउटपुटपासून पूर्णपणे स्वतंत्र असते तेव्हा त्याला ओपन-लूप कंट्रोल सिस्टिम म्हणतात. ॲक्च्युएटिंग सिग्नल केवळ इनपुट कमांडवर अवलंबून असतो आणि आउटपुटचे त्यावर कोणतेही नियंत्रण नसते. मॅन्युअल कंट्रोल सिस्टीम ही ओपन-लूप कंट्रोल सिस्टीम आहे.

ओपन-लूप कंट्रोल सिस्टिमचे घटक सहसा खालील दोन भागांमध्ये विभागले जाऊ शकतात.

1. कंट्रोलर;
2. कंट्रोल्ड प्रोसेस.



Fig 1.2
ओपन-लूप कंट्रोल सिस्टीमची ब्लॉक डायग्राम

ओपन-लूप कंट्रोल सिस्टिम ही एक प्रकारची सिस्टिम आहे जी फीडबॅकशिवाय कार्य करते. याचा अर्थ असा की सिस्टिमचे आउटपुट मोजले जात नाही आणि इनपुट ॲडजस्ट करण्यासाठी वापरले जात नाही. त्याऐवजी, इनपुट केवळ पूर्वनिर्धारित व्हॅल्यूवर सेट केले जाते आणि सिस्टिम त्याच्या नॅचुरल एंडपॉइंट पर्यंत

पोहोचेपर्यंत चालण्याची परमिशन दिली जाते. ओपन-लूप कंट्रोल सिस्टिमच्या सिम्पलीसिटी आणि इकॉनॉमीमुळे आपल्याला बऱ्याच नॉन-क्रिटिकल ॲप्लिकेशन्समध्ये या प्रकारची सिस्टिम आढळते.

ओपन लूप कंट्रोल सिस्टीमचे उदाहरणे:

ओपन-लूप कंट्रोल सिस्टिमचे विविध वास्तविक जगातील परिस्थितींमध्ये ॲप्लिकेशन्स आहेत.

1. इलेक्ट्रिक फॅन: इनपुट ही इलेक्ट्रिकल पॉवर आहे, कंट्रोलर मध्यवर्ती स्थित शाफ्ट आहे जो फिरतो आणि आउटपुट म्हणजे पंख्याचा रोटेशनल स्पीड.
2. ओव्हन टेम्परेचर कंट्रोल: या बाबतीत आपण इच्छित तापमान सेट करतो आणि प्रत्यक्ष तापमानाचे सतत निरीक्षण न करता ओव्हन त्या तापमानापर्यंत गरम होते.
3. वॉशिंग मशीन सायकल सिलेक्शन: जेव्हा आपण कपड्यांच्या प्रकारानुसार वॉशिंग मशीन सायकल निवडतो तेव्हा मशीन सतत पाण्याचे तापमान किंवा कपड्यांची स्थिती न मोजता पूर्वनिर्धारित प्रोग्रामचे अनुसरण करते.
4. इलेक्ट्रॉनिक डिव्हाइससाठी रिमोट कंट्रोल: टीव्ही आणि इतर इलेक्ट्रॉनिक डिव्हाइसेससाठी रिमोट कंट्रोल डिव्हाइसने कमांड यशस्वीरित्या अंमलात आणली की नाही याबद्दल अभिप्राय न घेता कमांड पाठवतात.

1.2.2 **क्लोज्ड-लूप कंट्रोल सिस्टीम:** क्लोज्ड-लूप कंट्रोल सिस्टिम ही एक सिस्टिम आहे ज्यामध्ये नियंत्रण क्रिया आउटपुटवर अवलंबून असते. क्लोज्ड-लूप कंट्रोल सिस्टिमचा प्राथमिक उद्देश सिस्टिमची स्टॅबिलिटी, अचूकता आणि एकंदर कार्यक्षमता वाढविणे आहे. या सिस्टिममध्ये कंट्रोल्ड आउटपुट फीडबॅक एलिमेंटद्वारे परत फीड केले जाते आणि रेफरन्स इनपुटशी तुलना केली जाते. अशा प्रकारे ॲक्च्युएटिंग सिग्नल म्हणजे डिझायर्ड आउटपुट आणि रेफरन्स इनपुटचा फरक.



Fig 1.3
क्लोज्ड-लूप कंट्रोल सिस्टीम

क्लोज्ड-लूप कंट्रोल सिस्टीमचे वर्किंग: नियंत्रक सतत फीडबॅक एलेमेंट्सद्वारे डिझायर्ड इनपुटची ॲक्चुअल आउटपुटशी तुलना करतो. जर डिफरन्स (एरर) असेल तर कंट्रोलर एरर कमी करण्यासाठी त्याचे आउटपुट प्लांटमध्ये ॲडजस्ट करतो. हे सतत मॉनिटरिंग आणि ॲडजस्टमेंट प्लांटमध्येच डिस्टर्बन्सेस किंवा बदल झाले तरीही आउटपुट डिझायर्ड इनपुटच्या जवळ ठेवते.

क्लोज्ड-लूप कंट्रोल सिस्टिमची उदाहरणे:

आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक ॲप्लिकेशन्समध्ये क्लोज्ड लूप सिस्टिम चा वापर होतो.

1. एअर कंडिशनर - एअर कंडिशनर आपल्या खोलीच्या तापमानानुसार आपोआप त्याचे तापमान समायोजित करते.
2. सर्वो व्होल्टेज स्टॅबिलायझर - आउटपुट व्होल्टेज सिस्टिममध्ये परत फीड करून व्होल्टेजमध्ये स्थिरीकरण साध्य केले जाते.
3. वॉटर लेवल कंट्रोलर - वॉटर टँकमधील पाण्याची पातळी त्यात कधी पाणी ॲड करायचे ते ठरवते.
4. ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक आयर्न – इलेक्ट्रिक आयर्नच्या तापमानानुसार हीट आपोआप कंट्रोल होते.



Fig. 1.4

ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक आयर्न

(courtsey: Examples of Closed-Loop Control System - Electronics Coach)

टेबल 1.2

ओपन लूप सिस्टिम आणि क्लोज्ड लूप सिस्टिम मधील तुलना

क्र.सं.	पॅरामीटर्स	ओपन लूप सिस्टिम	क्लोज्ड लूप सिस्टिम
1	व्याख्या	ज्या सिस्टिमची कंट्रोल ॲक्शन आउटपुटपासून मुक्त असते त्याला ओपन लूप कंट्रोल सिस्टिम म्हणून ओळखले जाते..	क्लोज्ड लूपमध्ये, आउटपुट सिस्टिमच्या कंट्रोल ॲक्शनवर अवलंबून असते.
2	दुसरे नाव	नो फीडबॅक सिस्टिम	फीडबॅक सिस्टिम
3	घटक	कंट्रोलर आणि कंट्रोल्ड प्रोसेस	ॲम्प्लिफायर, कंट्रोलर, कंट्रोल्ड प्रोसेस, फीडबॅक
4	निर्मिती	सिम्पल	कॉम्प्लेक्स
5	विश्वसनीयता:	विश्वसनीय नाही	विश्वसनीय
6	अचूकता	कॅलिब्रेशनवर अवलंबून असते	फीडबॅकमुळे अचूक.
7	स्टॅबिलिटी	स्टेबल	कमी स्टेबल
8	रिस्पॉन्स	जलद	हळू
9	लिनिअरिटी	नॉन लिनिअर	लिनिअर
10	उदाहरणे	ट्रॅफिक लाईट, ऑटोमॅटिक वॉशिंग मशीन, टीव्ही रिमोट इ.	एअर कंडिशनर, तापमान कंट्रोल सिस्टिम, रेफ्रिजरेटर, टोस्टर.

1.2.3 लिनिअर आणि नॉन-लिनिअर कंट्रोल सिस्टिम:

1.लिनिअर कंट्रोल सिस्टिम: लिनिअर कंट्रोल सिस्टिम ही एक अशी सिस्टिम आहे जिथे इनपुट आणि आउटपुट मधील संबंध सोप्या आणि प्रपोरशनल नियमांचे अनुसरण केले जाते. म्हणजे इनपुट दुप्पट केल्यास आउटपुटही दुप्पट होईल. या सिस्टिमचे विश्लेषण आणि अंदाज लावणे सोपे आहे.

1. प्रपोरशनॅलिटी: आउटपुट थेट इनपुटच्या प्रमाणात असते.
2. सुपरपोझिशन: दोन इनपुट लावल्यास एकूण आउटपुट म्हणजे इंडीव्हिझ्यूल आऊटपुटची बेरीज.
3. होमोजेनीटी: इनपुट स्केल केल्यास (उदा. दुप्पट) आउटपुटही त्याच स्केलने मोजले जाते.

लिनिअर कंट्रोल सिस्टिम चे उदाहरण:

1. एअर कंडिशनर आणि हीटर, 2. डीसी मोटर स्पीड कंट्रोल, 3 ऑटोमोबाइल क्रूझ कंट्रोल
2. आरसी सर्किट (रेझिस्टर-कैपेसिटर सर्किट)

2.नॉन-लिनिअर कंट्रोल सिस्टिम: नॉन-लिनिअर कंट्रोल सिस्टिम ही अशी सिस्टिम आहे जिथे इनपुट आणि आउटपुट मधील संबंध प्रपोरशनल नसतो. या सिस्टिममध्ये, इनपुटमधील लहान बदलांमुळे आउटपुटमध्ये मोठे किंवा अनपेक्षित बदल होऊ शकतात. नॉन-लिनिअर सिस्टिम अधिक जटिल आणि विश्लेषण करणे कठीण आहे.नॉन-लिनियर कंट्रोल सिस्टीममध्ये खालील मुद्द्यांचा विचार केला जातो..

1. नॉन-प्रपोरशनॅलिटी: आउटपुट इनपुटसह प्रपोरशनल प्रमाणात मोजले जात नाही.
2. नो सुपरपोझिशन: वेगवेगळ्या इनपुटपासून एकूण आउटपुट म्हणजे फक्त वैयक्तिक आउटपुटची बेरीज नाही.
3. कॉम्प्लेक्स बिहेवियर: या सिस्टिममध्ये सॅच्युरेशन, डेड झोन किंवा अनपेक्षित प्रतिसाद यासारखे वर्तन असू शकते**.**

नॉन-लिनिअर कंट्रोल सिस्टिमची उदाहरणे:

1. रोबोटिक आर्म्स आणि मॅनिपुलेटर्स
2. व्हेईकल ससपेन्शन सिस्टिम
3. विमान उड्डाण नियंत्रण नॉनलाइनर फ्लाइट डायनॅमिक्स
4. पावर ग्रिड स्टॅबिलिटी
5. रासायनिक अणुभट्ट्या

टेबल 1.3

लिनिअर आणि नॉन-लिनिअर कंट्रोल सिस्टिम मधील तुलना:

पॅरामीटर	लिनिअर कंट्रोल सिस्टिम	नॉन-लिनिअर कंट्रोल सिस्टिम
संबंध	प्रपोरशनल (उदा. इनपुट दुप्पट केल्यास आउटपुट दुप्पट होते)	प्रपोरशनल नाही (आउटपुट चा अंदाज येत नाही)
बिहेवियर	प्रमाणित आणि कंसिस्टन्ट	अनएक्सपेक्टेड किंवा कॉम्प्लेक्स असू शकते
ऍनॅलिसिस (विश्लेषण)	साधी साधने वापरून विश्लेषण करणे सोपे (उदा. ट्रान्सफर फंक्शन)	कॉम्प्लेक्स असल्यामुळे विश्लेषण करणे कठीण
उदाहरण	रूम हीटिंग सिस्टिम, मोटर स्पीड कंट्रोल	व्हेईकल ससपेन्शन सिस्टिम, विमान उड्डाण कंट्रोल

1.2.4 टाइम-व्हेरिएंट आणि टाइम-इनव्हेरिएंट कंट्रोल सिस्टिम:

1. **टाइम-व्हेरिएंट कंट्रोल सिस्टिम:** टाइम-व्हेरिएंट कंट्रोल सिस्टिम ही अशी सिस्टिम आहे ज्याचे पॅरामीटर किंवा बिहेवियर काळानुसार बदलते. सिस्टिमची वैशिष्ट्ये निश्चित नसतात आणि काळानुसार ते बदलतात. विजेची बदलती मागणी, पर्यावरणीय फॅक्टर्स किंवा हंगाम (Season) यासारख्या बदलत्या परिस्थितीशी किंवा इनपुटशी ही सिस्टिम जुळवून घेते.

   टाइम-व्हेरिएंट कंट्रोल सिस्टिमची उदाहरणे:
   1. गाईडन्स आणि कंट्रोलसाठी अंतराळ-यान आणि विमाने.
   2. मानवरहित हवाई वाहने (यूएव्ही)
   3. रासायनिक प्रक्रिया आणि उत्पादन अशा विविध उद्योगांमध्ये वापरला जातो.
   4. स्मार्ट गिर्ड आणि एनर्जी मॅनेजमेंटमध्ये वापरले जाते.
   5. शेतीमध्ये वापरला जातो.
   6. मेडिकल व्हेंटिलेटर,
   7. कृषी आणि औद्योगिक रोबोट,
   8. एअर कंडिशनर.

2. **टाइम-इनव्हेरिएंट कंट्रोल सिस्टिम:** टाइम-इनव्हेरिएंट कंट्रोल सिस्टिम ही अशी सिस्टिम आहे जिचे बिहॅवियर आणि वैशिष्ट्ये काळानुसार बदलत नाहीत. एखाद्या इनपुटला सिस्टिमचा प्रतिसाद नेहमीच समान असतो, मग तो इनपुट केव्हा लागू केला जाईल याची पर्वा होत नाही. सिस्टिम वेळोवेळी एकसारखी आणि अंदाज लावता येण्यासारखी राहते.

   टाइम-इनव्हेरिएंट कंट्रोल सिस्टीममध्ये खालील मुद्द्यांचा विचार केला जातो.

   कॉन्स्टन्ट (स्थिर) पॅरामीटर्स: सिस्टिमचे पॅरामीटर्स, जसे की लाभ, गतिशीलता आणि रिस्पॉन्स टाईम, स्थिर असतात आणि काळानुसार बदलत नाहीत.

   प्रेडिक्टेबल बिहेवियर: जर आपण वेगवेगळ्या वेळी समान इनपुट लागू केले तर सिस्टिम प्रत्येक वेळी समान आउटपुट देईल.

टाइम-इनव्हेरिएंट कंट्रोल सिस्टिमची उदाहरणे:
1. डीसी मोटर स्पीड कंट्रोल
2. आरसी सर्किट (रेझिस्टर-कैपेसिटर सर्किट)
3. तापमान कंट्रोल सिस्टिम (थर्मोस्टॅट)
4. लिफ्ट कंट्रोल सिस्टिम
5. स्प्रिंग मास सिस्टिम.
6. स्वयंचलित प्रकाश सिस्टिम
7. लिनिअर एम्पलीफायर सर्किट

1.3 ट्रान्सफर फंक्शन: कंट्रोल सिस्टिमचे ट्रान्सफर फंक्शन हे एक गणितीय रिप्रेसेंटेशन आहे जे लॅप्लेस डोमेन (फ्रिक्वेन्सी डोमेन) मधील सिस्टिमच्या इनपुट आणि आउटपुटमधील संबंधांचे वर्णन करते. हे सामान्यत: टाइम-इनव्हेरिएंट सिस्टिमसाठी वापरले जाते. हे लॅप्लेस ट्रान्सफर आउटपुटचे लॅप्लेस ट्रान्सफर इनपुटशी गुणोत्तर आहे, सुरुवातीच्या सर्व कंडिशन्स शून्यावर सेट केल्या आहेत. हे सिस्टिम बिहॅवियर, स्टॅबिलिटी आणि फ्रीक्वेन्सी रिस्पॉन्सचे विश्लेषण करण्यास मदत करते.

Fig .1.5

ब्लॉक डायग्राम ट्रान्सफर फंक्शन

ट्रान्सफर फंक्शन G(s) ची व्याख्या अशी केली जाते:

$$G(s) = Y(s)/U(s)$$

जिथे:

Y(s) हे आउटपुटचे लॅप्लेस रूपांतर आहे.

U(s) हे इनपुटचे लॅप्लेस रूपांतर आहे.

s हे लॅप्लेस ट्रान्सफॉर्ममध्ये वापरले जाणारे कॉम्प्लेक्स फ्रिक्वेन्सी व्हेरिएबल आहे.

(लॅप्लेस ट्रान्सफॉर्म हे एक गणिती तंत्र आहे जे टाइम डोमेन (सहसा डिफरेंशियल समीकरण) पासून फ्रिक्वेन्सी डोमेनमध्ये (कॉम्प्लेक्स व्हेरिएबल s वापरुन) फंक्शनचे रूपांतर करण्यासाठी वापरले जाते. हे डिफरंशिअल समीकरणांचे बीजगणितीय समीकरणांमध्ये रूपांतर करून सिस्टिमचे, विशेषत: कंट्रोल सिस्टिमचे विश्लेषण सोपे करते)

टाइम-डोमेन फंक्शन f(t) द्वारे वर्णन केलेल्या सिस्टिमसाठी, त्याचे लॅप्लेस ट्रान्सफॉर्म f (s) द्वारे दिले जाते:

$$F(s) = \mathcal{L}\{f(t)\} = \int_0^{\infty} f(t)e^{-st}\,dt$$

जिथे:

f (t) म्हणजे टाइम-डोमेन फंक्शन (उदा., इनपुट किंवा आउटपुट सिग्नल),

s म्हणजे कॉम्प्लेक्स व्हेरिएबल,

F(s) हे लॅप्लेस डोमेनमधील ट्रान्सफर फंक्शन आहे.

1.3.2 इलेक्ट्रिकल सर्किटचे ट्रान्सफर फंक्शन (RL, RC, LC, आणि RLC सर्किट):

निष्क्रिय एलिमेंटचे (Paasive Element) लॅप्लेस ट्रान्सफर (R, L आणि C)

लॅप्लेस ट्रान्सफॉर्म वेगवेगळ्या सर्किट एलेमेंट्सवर स्वतंत्रपणे वापरले जाऊ शकते आणि नंतर सर्किट पूर्णपणे s डोमेनमध्ये सोडविले जाऊ शकते. (जे खूप सोपे आहे).

1. **R चे लॅप्लेस ट्रान्सफॉर्म:** रेसिस्टर्स हे वेळ आणि फ्रिक्वेन्सी व्हेरिएन्ट आहेत. म्हणजेच रेसिस्टरचा ट्रान्सफॉर्म आणि रेसिस्टरचे रेसिस्टन्स सारखेच असते. $\mathcal{L}\{R\} = R$

   (येथे, $\mathcal{L}$: - लाप्लास ट्रान्सफॉर्म सिम्बॉल)

2. **C चे लॅप्लेस ट्रान्सफॉर्म:** टाइम डोमेनमधील व्होल्टेज, करंट आणि कॅपेसिटन्स यांच्यातील संबंध पाहूया,

$$i(t) = C \frac{dv(t)}{dt}$$

व्होल्टेजसाठी सोडवताना, खालील समीकरण मिळते.

$$v(t) = \frac{1}{C}\int_0^t i(t)\,dt$$

मग हे समीकरण लॅप्लेस डोमेनमध्ये रूपांतरित करून खालील समीकरण मिळते.

$$V(s)=\frac{1}{C}\frac{1}{s}I(\mathrm{s})$$

पुन्हा V (s) / I (s) गुणोत्तरासाठी सोडविल्यास, खालील समीकरण मिळते.

$$\frac{V(\mathrm{s})}{I(\mathrm{s})}=\frac{1}{sC}$$

म्हणून कॅपेसिटन्स C असलेल्या कॅपेसिटरचे ट्रान्सफर खालीलप्रकारे दिले जाते.

$\mathscr{L}$(Capacitor) = 1 / sC

3. **L चे लॅप्लेस ट्रान्सफॉर्म:**

टाईम डोमेनमध्ये व्होल्टेज, करंट आणि इंडक्टन्स यांच्यातील संबंध पाहूया:

$$v(\mathrm{t})=\mathrm{L}\frac{di(\mathrm{t})}{dt}$$

हे लॅप्लेस डोमेनमध्ये ठेवून, फॉर्मुला मिळतो

$$V(\mathrm{s})=\mathrm{sLI(s)}$$

आणि गुणोत्तर मिळतो

$$\frac{V(\mathrm{s})}{\mathrm{I(s)}}=\mathrm{sL}$$

त्यामुळे इंडक्शन L असलेल्या इंडक्टरचा ट्रान्सफॉर्म असा आहे

$\mathscr{L}$(Inductor) = sL

खालील मूलभूत RL, RC, LC, आणि RLC सर्किटसाठी ट्रान्सफर फंक्शन्स आहेत:

1. **RL सर्किट (रेसिस्टर + इंडक्टर):**

   प्रकार: लो-पास फिल्टर (करंट रिस्पॉन्स)

   ट्रान्सफर फंक्शन:

$$H(s)=\frac{I(s)}{V(s)}=\frac{1}{Ls+R}$$

   सर्किट इंडक्टरमुळे करंटमधील बदलांना प्रतिकार करतो. हे कमी-फ्रिक्वेन्सी सिग्नलला पास होऊ देते आणि उच्च-फ्रिक्वेन्सी सिग्नलला ब्लॉक करते.

2. **RC सर्किट (रेसिस्टर + कॅपॅसिटर):**

   प्रकार: लो-पास किंवा हाय-पास फिल्टर (कॉन्फिगरेशनवर अवलंबून)

   ट्रान्सफर फंक्शन:

$$H(s)=\frac{V_{\text{out}}(s)}{V_{\text{in}}(s)}=\frac{1}{1+sRC}$$

   कॅपॅसिटर डीसी सिग्नल ब्लॉक करते आणि एसी सिग्नल पास करण्यास अनुमती देते. फिल्टरिंग ॲप्लिकेशन्समध्ये वापरले जाते..

3. **LC सर्किट (इंडक्टर + कॅपॅसिटर):**

   प्रकार: रेझोनंट सर्किट (ऑस्सीलेटर)

ट्रान्सफर फंक्शन:

$$H(s) = \frac{1}{Ls^2 + \frac{1}{C}}$$

हे सर्किट एका विशिष्ट फ्रिक्वेन्सीवर प्रतिध्वनित (Resonate) होते, ज्यामुळे ते रेडिओ आणि दळणवळण प्रणालींमध्ये उपयुक्त ठरते.

4. RLC सर्किट (रेसिस्टर + इंडक्टर + कॅपॅसिटर)

प्रकार: बँड-पास किंवा बँड-स्टॉप फिल्टर

ट्रान्सफर फंक्शन:

$$H(s) = \frac{1}{Ls + R + \frac{1}{Cs}}$$

R, L आणि C च्या मूल्यांवर अवलंबून, हे सर्किट इतरांना परवानगी देताना विशिष्ट फ्रिक्वेन्सी फिल्टर करू शकते.

1.4 ब्लॉक डायग्राम रिडक्शन टेक्निक: ब्लॉक डायग्राम रिडक्शन टेक्निक हे कंट्रोल सिस्टिम इंजिनीअरिंग आणि इतर क्षेत्रांमध्ये एक महत्त्वपूर्ण तंत्र आहे जेथे सिस्टिम विझ्युअली दर्शविले जाते. हे कॉम्प्लेक्स आकृती सोपे करते, ज्यामुळे ते समजून घेणे आणि विश्लेषण करणे सोपे होते.

1.4.1 ब्लॉक डायग्राम रिडक्शन तंत्राचे फायदे / गरज:

1. **सिम्पलिफिकेशन:** विझ्युअल गोंधळ (Visual clutter) कमी होतो, ज्यामुळे सिस्टिमचे रेप्रेसेंटेशन अधिक मॅनेजेबल होते. एकाच समान ब्लॉकमध्ये अनेक ब्लॉक्स एकत्र होतात, एकंदर रचना सोपी होते.
2. **इम्प्रोव्हड अंडरस्टॅण्डिंग:** स्पष्टता वाढवते, सिस्टिमची कार्यक्षमता आणि सिग्नल फ्लो समजून घेणे सोपे होते. अभियंते आणि भागधारकांना सिस्टिमचे बिहॅवियर लवकर समजून घेण्यास सक्षम करते.
3. **इफिशिएंट ॲनालीसिस** (विश्लेषण): स्टॅबिलिटी, ट्रान्सफर फंक्शन आणि टाइम रिस्पॉन्स यासारख्या सिस्टिम वैशिष्ट्यांचे विश्लेषण करण्याची प्रक्रिया सोपी करते. विश्लेषणासाठी गणिती साधने आणि तंत्रे वापरणे सोपे करते.
4. **डिझाइन आणि सिंथेसिस सोपे करते:** सिस्टिम संरचना सुधारण्यासाठी ब्लॉक डायग्रॅमची सोपी हाताळणी इनॅबल करते. रिपीटेटिव्ह डिझाइन प्रक्रिया आणि सिस्टिम परफॉर्मन्स ऑप्टिमायझेशनला सपोर्ट करते.
5. **(ट्रबलशूटिंग) समस्या निवारण:** सिस्टिममधील समस्याग्रस्त घटक किंवा कनेक्शन वेगळे करण्यास मदत करते. सिस्टिमच्या अपयश ओळखण्याची आणि सोडवण्याची प्रक्रिया सोपी करते.
6. **सुधारित कम्युनिकेशन:** सिस्टिमचे स्पष्ट आणि संक्षिप्त रेप्रेसेंटेशन देते, जे टीम सदस्य आणि स्टेकहोल्डर्सला शेअर करता येईल आणि समजून घेता येईल.

टेबल 1.5

ब्लॉक डायग्राम अल्जेब्रासाठी नियम:

रुल	मूळ आकृती	समतुल्य आकृती
कॅस्केडमध्ये ब्लॉक एकत्र करणे		

रुल	मूळ आकृती	समतुल्य आकृती
समांतर ब्लॉक एकत्र करणे		
ब्लॉकच्या मागे पिक ऑफ पॉईंट हलविणे		
ब्लॉकच्या पुढे पिक ऑफ पॉईंट हलविणे		
ब्लॉकच्या मागे एक समिंग पॉईंट हलविणे		
ब्लॉकच्या पुढे एक समिंग पॉईंट हलविणे		 

ब्लॉक डायग्राम सोपी (कमी) करण्यासाठी आणखी काही नियम, ज्यात बरेच ब्लॉक्स, समिंग पॉईंट्स आणि टेक-ऑफ पॉईंट्स आहेत:

नियम 1 - सिरिजमध्ये जोडलेले ब्लॉक तपासा आणि सोपे करा.
नियम २ - पॅरेलल जोडलेले ब्लॉक तपासा आणि सोपे करा.
नियम 3 - फीडबॅक लूपमध्ये जोडलेले ब्लॉक तपासा आणि सोपे करा.
नियम ४ - सिम्प्लिफाय करताना टेक-ऑफ पॉईंटमध्ये अडचण येत असेल तर उजवीकडे हलवा.
नियम ५ - सोपा करताना समिंग पॉईंटची अडचण येत असेल तर तो डावीकडे हलवावा.
नियम ६ - सोपा फॉर्म मिळेपर्यंत म्हणजे सिंगल ब्लॉक मिळेपर्यंत वरील स्टेप रिपीट करा.
एकाच ब्लॉकमध्ये प्रेसेंट असलेले ट्रान्सफर फंक्शन म्हणजे ओव्हरऑल ब्लॉक डायग्रामचे ट्रान्सफर फंक्शन आहे.

1.4.3 ब्लॉक डायग्राम रिडक्शन टेक्नीकचे उदाहरण:

खालील आकृतीमध्ये दर्शविलेल्या ब्लॉक डायग्रामचा विचार करा. ब्लॉक डायग्राम रिडक्शन टेक्निकचा वापर करून आपण ही ब्लॉक डायग्राम सोपी (कमी) करूया.



स्टेप 1 - ब्लॉक G_1 आणि G_2 साठी नियम 1 वापरा. ब्लॉक G_3 आणि G_4 साठी नियम 2 वापरा. मॉडिफाइड ब्लॉक डायग्राम खालील आकृतीमध्ये दर्शविली आहे.



स्टेप 2 – G_1 G_2 आणि H_1 ब्लॉकसाठी नियम 3 वापरा. ब्लॉक G5 नंतर टेक-ऑफ पॉईंट शिफ्ट करण्यासाठी नियम 4 वापरा. सुधारित ब्लॉक डायग्राम खालील फिगरमध्ये दर्शविली आहे.



स्टेप 3 – ब्लॉक (G_3 + G_4) आणि G_5 साठी नियम 1 वापरा. सुधारित ब्लॉक डायग्राम खालील फिगरमध्ये दर्शविली आहे.



स्टेप 4 – ब्लॉक (G_3 + G_4) G_5 आणि H3 साठी नियम 3 वापरा. सुधारित ब्लॉक डायग्राम खालील फिगरमध्ये दर्शविली आहे.



स्टेप 5 – सिरिजमध्ये जोडलेल्या ब्लॉक्ससाठी नियम 1 वापरा. सुधारित ब्लॉक डायग्राम खालील फिगरमध्ये दर्शविली आहे.



स्टेप 6 – फीडबॅक लूपमध्ये जोडलेल्या ब्लॉक्ससाठी नियम 3 वापरा. सुधारित ब्लॉक डायग्राम खालील फिगरमध्ये दर्शविली आहे. हि सोपी ब्लॉक डायग्राम आहे.



म्हणून, या सिस्टिमचे ट्रान्सफर फंक्शन आहे
ट्रान्सफर फंक्शन **= Y(s) / R(s) =**

$$\frac{G_1G_2\,G_5{}^2(G_3+G_4)}{(1+G_1G_2H_1)\{1+(G_3+G_4)G_5H_3\}G_5-G_1G_2G_5(G_3+G_4)H_2}$$

ब्लॉक डायग्राम रिडक्शन टेक्नीकच्या प्रक्रियेस गुंतागुंतीच्या सिस्टिमसाठी अधिक वेळ लागतो. कारण, त्यासाठी प्रत्येक टप्प्यानंतर (पार्टीअल्ली सिम्पलीफाईड) ब्लॉक डायग्राम काढणे आवश्यक आहे.

प्रॉब्लेम 1. ब्लॉक डायग्राम रिडक्शन टेक्निकचा वापर करून प्रॉब्लेम सोडवा:







प्रॉब्लेम 2. ब्लॉक डायग्राम रिडक्शन टेक्निकचा वापर करून प्रॉब्लेम सोडवा:



(a)



(b)



(c)

Questions

1. Define control system. [R]
2. State different elements of control system. [U]
3. Draw the block diagram of control system. [A]
4. State the purpose of a controller and feedback element in a control system.[U]
5. Write any four examples of control systems. [R]
6. Explain open-loop control system with block diagram. [U]
7. Give any four real-world examples of open-loop and closed-loop control system with proper justification. [A]
8. Explain closed-loop control system with block diagram. [U]
9. Compare open-loop and closed-loop control systems on basis of i) components, ii) accuracy, iii) stability and iv) linearity. [A]
10. Explain Time-variant and Time-invariant control system. [U]
11. Write any four examples of Time-variant control system. [R]
12. Compare Non-linear control system with linear control system on basis of i) Relationship, ii) behavior and iii) analysis. [A]
13. Explain Transfer function in a control system [U]
14. Obtain the transfer function of RLC network. [A]
15. Obtain transfer function of RC network. [A]
16. State the importance of transfer function in control systems. [U]
17. Explain the relationship between input and output in the Laplace domain using a transfer function. [U]
18. Explain transfer function for RC, RL circuit using Laplace transform. [U]
19. Explain block reduction technique. [U]
20. Write the benefits of block reduction technique. [A]
21. Write any four rules used in block diagram reduction technique. [R]
22. Explain the need of block diagram reductions techniques. [U]
23. State any four practical applications of control system. [U]
24. Simplify the problem using block diagram reduction technique. [A]



Unit 2 Time Domain Analysis
टाइम डोमेन ॲनालिसिस

विषय निष्पत्ती (CO): स्टँडर्ड इनपुट सिग्नलसाठी दिलेल्या कंट्रोल सिस्टिमचे विश्लेषण करा

घटक निष्पत्ती (Theory Learning Outcomes):

TLO 2.1 दिलेल्या कंट्रोल सिस्टिमचे टाइम रिस्पॉन्स काढणे

TLO 2.2 स्टँडर्ड टेस्ट इनपुट्सची त्याच्या लाप्लास ट्रान्सफॉर्मसहित लिस्ट करा.

TLO 2.3 फर्स्ट-ऑर्डर सिस्टिमचा टाइम रिस्पॉन्स काढणे.

TLO 2.4 सेकंड ऑर्डर सिस्टिमची डायग्राम काढणे.

2.1 टाइम डोमेन ॲनालिसिस (Time Domain Analysis) - कंट्रोल सिस्टिम दोन प्रकारच्या अवस्थांमध्ये काम करते. एक म्हणजे ट्रान्झिएंट (Transient) म्हणजेच बदलत्या स्थितीतील (डायनामिक) आणि दुसरी स्टेडी स्टेट (Steady State) म्हणजेच स्थिर स्थिती. या दोन्ही अवस्थांमध्ये सिस्टिम कशी वागते याचा अभ्यास करण्याला टाइम रिस्पॉन्स (Time Response) म्हणतात.

सिस्टिमचा अभ्यास करताना पहिलं पाऊल म्हणजे त्या सिस्टिमचं मॅथेमॅटिकल मॉडेल (Mathematical Model) तयार करणे. यानंतर, जर आपल्याला कुठलाही ठराविक इनपुट सिग्नल (Input Signal) दिला तर, त्याचा पूर्ण टाइम रिस्पॉन्स (Time Response) कसा असेल हे काढण्यासाठी लाप्लास ट्रान्सफॉर्म इनव्हर्जन (Laplace Transform Inversion) वापरतात.

टाइम रिस्पॉन्स: सिस्टिमला दिलेल्या एक्सायटेशन (Excitation) मुळे सिस्टिमचीजी प्रतिक्रिया (रिस्पॉन्स – Response) येते आणि जो वेळेनुसार बदलतो, त्याला त्या सिस्टिमचा टाइम रिस्पॉन्स (Time Response) म्हणतात.

Fig. 2.1

टाईप्स ऑफ टाइम रिस्पॉन्स

समजून घेण्यासाठी आपण ॲनालॉग ॲमीटर (Analog Ammeter) चं उदाहरण पाहू. मानूया की आपण त्याला 5A करंट (Current) दिला. ॲमीटरचं सुई (Pointer) लगेचच 5A दाखवत नाही, त्याला काही वेळ लागतो. त्या वेळेत सुई थोडीफार इकडे-तिकडे हलते, जसे की 5.2A, 4.8A, 5.1A, 4.9A असे वेगवेगळे वाचने (Readings) दाखवते आणि शेवटी 5A वर स्थिर होते. सुईने स्थिर होण्यापूर्वी घेतलेली ही हलचाल (Deflection) आणि त्यातील बदल ट्रान्झिएंट रिस्पॉन्स (Transient Response) म्हणून ओळखला जातो. तर, शेवटी मिळणारा स्थिर आउटपुट (Output) म्हणजे स्टेडी स्टेट रिस्पॉन्स (Steady State Response) आहे.

2.1.1 ट्रान्झिएंट रिस्पॉन्स (Transient response): सिस्टिमला अंतिम मूल्य मिळेपर्यंत आउटपुटमध्ये होणारे बदल (आउटपुट व्हारिएशन- Output Variation) याला ट्रान्झिएंट रिस्पॉन्स (Transient Response) म्हणतात.

ॲमीटरच्या सुईला (Pointer) अचूक मूल्य मिळवण्यासाठी लागणारा वेळ ट्रान्झिएंट टाइम (Transient Time) असतो. ट्रान्झिएंट रिस्पॉन्स (Transient Response) हा कधी हळूहळू कमी होणारा (Exponential) किंवा आवार-उतार करणारा (Oscillatory) असतो आणि तो Ct(t) ने दर्शवला जातो.

$$\lim_{t \to \infty} C_t\,(t) = 0$$

2.1.2 स्टेडी स्टेट रिस्पॉन्स (Steady state response): ट्रान्झिएंट रिस्पॉन्स (Transient Response) संपल्यानंतर जे उरते, त्याला स्टेडी स्टेट रिस्पॉन्स (Steady State Response) म्हणतात. हे साधारणपणे सिस्टिमने शेवटी मिळवलेले अंतिम मूल्य असते. याला Css(t) ने दर्शवले जाते. स्टेडी स्टेट रिस्पॉन्स (Steady State Response) मधून एरर (Error) बद्दल माहिती मिळते, म्हणजेच डिझायर्ड आउटपुट (Desired Output) आणि ॲक्च्युअल आउटपुट (Actual Output) यामधला फरक समजतो. यातून एरर (Error) कायम स्थिर (constant) आहे का वेळेनुसार बदलतो, याचीही माहिती मिळते.



Fig.2.2
ग्राफिकल रीप्रेजेंटेशन ऑफ टाइम रिस्पॉन्स
)Graphical representation of Time Response(

त्यामुळे टोटल टाइम रिस्पॉन्स (Total Time Response) हा खालीलप्रमाणे मिळतो.

$$C(t) = C_{ss} + C_t(t)$$

उदाहरणार्थ (Example(
कंट्रोल सिस्टिम (Control System) च्या टाइम रिस्पॉन्स (Time Response) मधील ट्रान्झिएंट (Transient) आणि स्टेडी स्टेट टर्म्स (Steady State Terms) शोधूया.

$$C(t) = 5 + 2e^{-t}$$

इथे, दुसरा भाग $2e^{-t}$ हा t = (infinity) असल्यावर '0' होतो. म्हणून हाच ट्रान्झिएंट टर्म (Transient Term) आहे. आणि पहिला भाग '5', t इंफिनिटी (infinity) जरी झाले तरी तसाच राहतो. म्हणून हाच स्टेडी स्टेट टर्म (Steady State Term) आहे.

नोंद: डिझायर्ड आउटपुट **(**Desired Output**)** आणि अॅक्च्युअल आउटपुट **(**Actual Output**)** मधला फरक स्टेडी स्टेट एरर **(**Steady State Error (e_{ss})**)** म्हणून ओळखला जातो. हे सिस्टिमची अचूकता **(**Accuracy**)** दर्शवते.

2.1.3 कॉन्सेप्ट ऑफ पोल्स आणि झिरोज (Concept of Poles & Zeros) : ट्रान्सफर फंक्शन (Transfer Function): आउटपुटचा लाप्लास ट्रान्सफॉर्म **(**Laplace Transform of Output**)** आणि इनपुटचा लाप्लास ट्रान्सफॉर्म **(**Laplace Transform of Input**)** यांचे गुणोत्तर, '0' इनिशियल कंडिशन्स **(**Zero Initial Conditions**)** गृहीत धरून, याला ट्रान्सफर फंक्शन **(**Transfer Function**)** म्हणतात. ट्रान्सफर फंक्शन (Transfer Function) हे फ्रिक्वेन्सी डोमेन (Frequency Domain) मधील एक गणितीय सादरीकरण आहे, जे 'एस' पॉलिनोमियल ('s' Polynomial) च्या प्रमाणाच्या मदतीने दर्शवले जाते. i.e. ट्रान्सफर फंक्शन (Transfer function) =

$$G(s) = \frac{Z(s)}{P(s)}$$

This transfer function can be expressed as given below:

$$G(s) = \frac{a_0 S^m + a_1 S^{m-1} + a_2 S^{m-2} + a_3 S^{m-3} + \cdots \ldots \ldots \ldots \ldots \ldots + a_m}{b_0 S^n + b_1 S^{n-1} + b_2 S^{n-2} + b_3 S^{n-3} + \cdots \ldots \ldots \ldots \ldots + b_n}$$

The numerator and denominator can be factorised:

$$G(s) = \frac{a_0 (s - Z_1)(s - Z_2)(s - Z_3) \ldots \ldots \ldots \ldots \ldots \ldots (s - Z_m)}{b_0 (s - P_1)(s - P_2)(s - P_3) \ldots \ldots \ldots \ldots (s - P_n)}$$

If,

$$K = \frac{a_0}{b_0}$$

Then, Transfer Function = G(s)

$$G(s) = K \frac{(s - Z_1)(s - Z_2)(s - Z_3) \ldots \ldots \ldots \ldots \ldots \ldots (s - Z_m)}{(s - P_1)(s - P_2)(s - P_3) \ldots \ldots \ldots \ldots (s - P_n)}$$

Where, K is called gain factor.

2.1.4 पोल्स ऑफ ट्रान्सफर फंक्शन (Poles of transfer function):

ट्रान्सफर फंक्शनचे पोल्स (Poles of a Transfer Function) हे असे असतात:

1. असे 'एस' चे व्हॅल्यूज (Values of s) जे ट्रान्सफर फंक्शन (Transfer Function) ला (infinity) करतात.
2. ट्रान्सफर फंक्शनच्या (Transfer Function) डिनॉमिनेटरचे रूट्स (Roots of the Denominator) जे न्युमिरेटरच्या रूट्स (Roots of the Numerator) बरोबर असतात.

ट्रान्सफर फंक्शन)Transfer Function(= G(s)

$$G(s) = \frac{a_0 (s - Z_1)(s - Z_2)(s - Z_3) \ldots \ldots \ldots \ldots \ldots \ldots (s - Z_m)}{b_0 (s - P_1)(s - P_2)(s - P_3) \ldots \ldots \ldots \ldots (s - P_n)}$$

सिस्टिमचे पोल्स **(**Poles of the System**)** म्हणजे ट्रान्सफर फंक्शनच्या **(**Transfer Function**)** डिनॉमिनेटर पॉलिनोमियलचे रूट्स **(**Roots of the Denominator Polynomial**).**

उदा. वरील ट्रान्सफर फंक्शन G(s) मध्ये P1, P2,... Pn हे सिस्टिमचे पोल्स **(**Poles of the System**)** आहेत. हे असे 'एस' चे व्हॅल्यूज **(**Values of s**)** असतात जे ट्रान्सफर फंक्शनला इंफिनिटी (infinity) करतात**,** जेव्हा ते डिनॉमिनेटरमध्ये सबस्टिट्यूट केले जातात.

डेफिनिशन: वरील ट्रान्सफर फंक्शन इक्वेशनमध्ये**,** असे पॉलिनोमियल व्हॅल्यूज **(**Polynomial Values**)** जे ट्रान्सफर फंक्शन इंफिनिटी (infinity) करतात**,** त्यांना ट्रान्सफर फंक्शनचे पोल्स **(**Poles of Transfer Function**)** म्हणतात.

उदा. जर आपण s = P1, P2,… Pn सबस्टिट्यूट केले, तर वरील इक्वेशनमध्ये ट्रान्सफर फंक्शन इंफिनिटी (infinity) होतो.

म्हणून P1, P2,… Pn यांना ट्रान्सफर फंक्शनचे पोल्स (Poles of Transfer Function) म्हणतात.

जर ट्रान्सफर फंक्शनचा डिनॉमिनेटर '0' बरोबर इक्वेट केला, म्हणजेच,

i.e. $(s - P_1)(s - P_2)(s - P_3) \dots \dots \dots \dots (s - P_n) = 0$

तर या इक्वेशनचे रूट्स म्हणजेच ट्रान्सफर फंक्शनचे पोल्स **(**Poles of Transfer Function**)** असतात.

उदाहरण: जर एखाद्या सिस्टिमचा ट्रान्सफर फंक्शन खालीलप्रमाणे दिला असेल,

$$G(s) = \frac{s(s+2)(s+4)}{s(s+3)(s+4)}$$

म्हणून पोल्स काढण्यासाठी डिनॉमिनेटर '0' बरोबर इक्वेट करावा लागतो.

उदा.

s (s+3) (s+4) = 0

वरील व्हॅल्यूज ट्रान्सफर फंक्शनला (infinity) करतात**,** त्यामुळे या ट्रान्सफर फंक्शनचे तीन पोल्स आहेत. म्हणजेच कॅरेक्टरिस्टिक इक्वेशन **(**Characteristic Equation**)** नुसार**, s** = **0, s** = -3 आणि **s** = -4 हे ट्रान्सफर फंक्शनचे पोल्स आहेत.

ट्रान्सफर फंक्शनचे झिरोज (Zeros of Transfer Function) हे असे असतात:

1. असे 'एस' चे व्हॅल्यूज (Values of s) जे ट्रान्सफर फंक्शनला '0' करतात.
2. ट्रान्सफर फंक्शनच्या न्युमिरेटरचे रूट्स (Roots of the Numerator) जे डिनॉमिनेटरच्या रूट्स (Roots of the Denominator) बरोबर असतात.

Transfer Function = G(s)

$$G(s) = \frac{a_0(s - Z_1)(s - Z_2)(s - Z_3) \dots \dots \dots \dots \dots \dots (s - Z_m)}{b_0(s - P_1)(s - P_2)(s - P_3) \dots \dots \dots \dots (s - P_n)}$$

ट्रान्सफर फंक्शनचे झिरोज (Zeros of Transfer Function) म्हणजे न्युमिरेटर पॉलिनॉमियलचे रूट्स असतात.

उदा. वरील ट्रान्सफर फंक्शन G(s) मध्ये, Z1, Z2,… Zm हे सिस्टिमचे झिरोज आहेत. हे असे एस (s(चे व्हॅल्यूज असतात, जे न्युमिरेटरमध्ये सबस्टिट्यूट केल्यावर ट्रान्सफर फंक्शन '0' होते.

वरील ट्रान्सफर फंक्शन इक्वेशनमध्ये, जे व्हॅल्यूज ट्रान्सफर फंक्शन '0' करतात, त्यांना ट्रान्सफर फंक्शनचे झिरोज म्हणतात.

उदा. जर आपण s = Z1, Z2,… Zn सबस्टिट्यूट केले,

तर वरील इक्वेशनमध्ये ट्रान्सफर फंक्शन '0' होतो.

म्हणून Z1, Z2,… Zn यांना झिरोज ऑफ ट्रान्सफर फंक्शन म्हणतात.

जर ट्रान्सफर फंक्शनचा न्युमिरेटर ‘0’ बरोबर इक्वेट केला, म्हणजेच, i.e.
$(s - Z_1)(s - Z_2) \dots \dots . . (s - Z_n) = 0$
तर या इक्वेशनचे रूट्स म्हणजेच झिरोज ऑफ ट्रान्सफर फंक्शन असतात.
उदाहरण: जर सिस्टिमचा ट्रान्सफर फंक्शन खालीलप्रमाणे दिला असेल,

$$G(s) = \frac{s(s+2)}{s(s+3)(s+5)}$$

तर झिरोज (Zeros) मिळवण्यासाठी न्युमिरेटरला 0 बरोबर इक्वेट करतो. i.e. $s(s+2) = 0$
वरील व्हॅल्यूज ट्रान्सफर फंक्शन ‘0’ करतात, त्यामुळे हे ट्रान्सफर फंक्शनचे झिरोज आहेत.
म्हणजेच s = 0 and s = -2 हे दोन झिरोज ऑफ ट्रान्सफर फंक्शन आहेत.

2.1.5 Poles and Zeros of a First-Order System: An Example



Fig. 2.3 (a)
सिस्टीम शोईंग इनपुट आणि आउटपुट
)System showing input and output(



Fig. 2.3 (b)
पोल-जीरो प्लॉट ऑफ द सिस्टीम
)pole-zero plot of the system(



Fig. 2.3 (c)
एवोलुशन ऑफ अ सिस्टीम रिस्पॉन्स (evolution of a system response.(

(एवोलुशन ऑफ अ सिस्टीम रिस्पॉन्स जेनेरेटेड बाय पोल व जीरो बघण्यासाठी ब्लू अरोजला फॉलो करा (Follow blue arrows to see the evolution of the response component generated by the pole or zero.)

दिलेल्या ट्रान्सफर फंक्शन G(s) मध्ये, s = -5 वर पोल (Pole) आणि s = -2 वर झिरो (Zero) आहे.
ही व्हॅल्यूज कॉम्प्लेक्स एस (s(-प्लेनवर प्लॉट केल्या जातात, जिथे '×' हे पोलसाठी (Pole) आणि '○' हे झिरोसाठी (Zero) वापरले जाते.
पोल आणि झिरोचे गुणधर्म (Properties) समजून घेण्यासाठी, युनिट स्टेप रिस्पॉन्स (Unit Step Response) काढूया.
त्यासाठी, फिगर 2.3 (a) मधील ट्रान्सफर फंक्शनला स्टेप फंक्शनने (Step Function) गुणिले जाते.

$$C\,(s) = \frac{(s+2)}{s(s+5)} = \frac{A}{s} + \frac{B}{s+5} = \frac{\frac{2}{5}}{s} + \frac{\frac{3}{5}}{s+5}$$

….(2.1)

Where,

$$A = \frac{(s+2)}{(s+5)}|s \to 0 \;\; = \frac{2}{5}$$

$$B = \frac{(s+2)}{s}|s \to -5 \;\; = \frac{2}{5}$$

Thus,

$$C(t) = \frac{2}{5} + \frac{3}{5}\, e^{-5t}$$

…………………….(2.2)

इनपुट फंक्शनचा पोल (Pole) हा फोर्स्ड रिस्पॉन्स (Forced Response) तयार करतो. उदाहरणार्थ, s = 0 वरील पोलने आउटपुटमध्ये स्टेप फंक्शन (Step Function) निर्माण केले.
ट्रान्सफर फंक्शनचा पोल हा नॅचरल रिस्पॉन्स (Natural Response) तयार करतो. उदाहरणार्थ, s = -5 वरील पोलने आउटपुटमध्ये e^{-5t} तयार केले.
रिअल ऍक्सिस (Real Axis) वरील पोल हा $e^{-\alpha t}$ या स्वरूपात एक्स्पोनेंशियल (Exponential) रिस्पॉन्स तयार करतो, जिथे '-α' हा पोलचा रिअल ऍक्सिसवरील लोकेशन असतो. '→' जर पोल रिअल ऍक्सिसवर डावीकडे जास्त लांब असेल, तर ट्रान्झियंट रिस्पॉन्स (Transient Response) लवकर '0' होईल. (उदा. s = -5 ने e^{-5t} तयार केले.)
झिरो (Zero) आणि पोल (Pole) हे फोर्स्ड आणि नॅचरल रिस्पॉन्सची अम्प्लिट्यूड (Amplitude) ठरवतात.
→ हे समीकरण (2.1) मध्ये A आणि B च्या गणनेतून समजते.

2.1.6 कॅरॅक्टरिस्टिक इक्वेशन (CharacteristicEquation): ट्रान्सफर फंक्शनच्या डिनॉमिनेटरला (Denominator) '0' बरोबर ठेवून मिळणाऱ्या समीकरणाला कॅरॅक्टरिस्टिक इक्वेशन.म्हणतात. या समीकरणाच्या रूट्स (Roots) म्हणजे त्या सिस्टिमचे पोल्स (Poles) असतात.

$$F(s) = b_0S^n + b_1S^{n-1} + b_2S^{n-2} + b_3S^{n-3} + \cdots \ldots \ldots \ldots \ldots . . + b_n = 0$$

हे कॅरॅक्टरिस्टिक इक्वेशन (characteristic equation) आहे.

2.1.6 एस प्लेन रीप्रेजेंटेशन (S-Plane Representation): S-Plane (S-प्लेन) किंवा Complex Frequency Plane (कॉम्प्लेक्स फ्रिक्वेन्सी प्लेन) हा एका ग्राफसारखा असतो, जो एका कॉम्प्लेक्स (Complex) संख्येच्या रिअल (Real) आणि इमॅजिनरी (Imaginary) भागांमध्ये विभाजित केला जातो.

- X-अक्षावर (X-Axis) रिअल भाग (Real Part) दाखवला जातो आणि त्याला σ (sigma - सिग्मा) ने दर्शवले जाते.
- Y-अक्षावर (Y-Axis) इमॅजिनरी भाग (Imaginary Part) दाखवला जातो आणि त्याला jω (j ओमेगा - जे ओमेगा) ने दर्शवले जाते.

कॉम्प्लेक्स संख्येसाठी वापरण्यात येणारे समीकरण (गणिती वाक्य) s = σ + jω असे लिहिले जाते. याचा अर्थ, एस (S(-प्लेनवरील कोणत्याही बिंदूला (Point) σ आणि ω या जोडीतून दाखवता येते.

एस प्लेन (S-Plane(मधील विभाग:

- jω अक्षाच्या डाव्या बाजूला (Left Side) असलेला भाग Left Half Plane (LHP - लेफ्ट हाफ प्लेन) म्हणतात.
- jω अक्षाच्या उजव्या बाजूला (Right Side) असलेला भाग Right Half Plane (RHP - राइट हाफ प्लेन) म्हणतात.

एस (S(-प्लेनचा उपयोग कंट्रोल सिस्टिमच्या गुणधर्मांचे (Behaviour) ग्राफच्या मदतीने विश्लेषण करण्यासाठी केला जातो. कंट्रोल सिस्टिमच्या स्थिरतेसाठी (Stability) या एस)S(-प्लेनवरील पोल्स)Poles(कुठे आहेत, यावर अवलंबून असते.



Fig.2.4
एस प्लेन रीप्रेजेंटेशन
(S-plane representation)

2.1.5 ऑर्डर ऑफ सिस्टीम (Order of system(: कॅरॅक्टॅरिस्टिक इक्वेशन (Characteristic Equation) मधील '**s**' चा सर्वात मोठा घातांक हा सिस्टिमचा ऑर्डर (Order) दर्शवतो. इलेक्ट्रिकल सर्किटमध्ये, एनर्जी स्टोअरिंग डिव्हाइसेस (Energy Storing Devices) जसे की इंडक्टर (Inductor) आणि कॅपेसिटर (Capacitor) यांची संख्या सिस्टिमच्या ऑर्डरशी संबंधित असते. उदाहरण: जर एखाद्या सिस्टिमसाठी ट्रान्सफर फंक्शन खालीलप्रमाणे दिले असेल:

$$T.F. = \frac{s(s+2)}{s^4 + 7s^3 + 10s^2 + 5s + 5}$$

क्लोज लूप ट्रान्सफर फंक्शन (Close Loop Transfer Function) च्या डिनॉमिनेटर (Denominator) मधील **s** चा सर्वात मोठा घातांक (Highest Power) 4 आहे.

म्हणून ही 4th ऑर्डर सिस्टिम (4th Order System) आहे.

Numericals: 1] Calculate the order & Type of given system:

$$G(s) = \frac{(s+2)(s+5)}{s(s+3)(s+4)}$$

ANS:

$$C\,(s) = \frac{(s+2)(s+5)}{s(s+3)(s+4)}$$

वरील ट्रान्सफर फंक्शन्स (Transfer Functions) मधून मिळणारे पोल्स (Poles) म्हणजे s = 0, -3, -4 आहेत.

सिस्टिमचा (System) टाइप (Type) हा s = 0 वर असलेल्या पोल्सच्या संख्येवर ठरवला जातो. इथे एक पोल (Pole) s = 0 वर आहे.

म्हणून याला टाइप 1 सिस्टिम (Type 1 System) म्हणतात.

सिस्टिमचा ऑर्डर (Order of the System) म्हणजे कॅरॅक्टॅरिस्टिक इक्वेशन (Characteristic Equation) मधील 's' चा सर्वात मोठा घातांक (Highest Power) असतो.

म्हणून: s (s+3) (s+4)

$$= (s^2 + 3s)(s+4)$$
$$= s^3 + 3s^2 + 4s^2 + 12s$$
$$= s^3 + 7s^2 + 12s$$

इथे **'s'** चा सर्वात मोठा घातांक (Higest Power) 3 आहे.

म्हणून, दिलेल्या सिस्टिमचा ऑर्डर (Order of the System) = 3 आहे.

2] For given transfer function

$$G(s) = \frac{(s+2)(s+5)}{s(s+3)(s+4)}$$

Find: (i) Poles (ii) Zeros (iii) Characteristic equation (iv) Pole Zero plot

ANS:

$$G(s) = \frac{(s+2)(s+5)}{s(s+3)(s+4)}$$

Poles (पोल्स): पोल्स हे समीकरणाच्या त्या मूळसंख्या (roots) आहेत ज्या डिनॉमिनेटर (Denominator) ला **'0'** समकक्ष (equal) ठेवल्यावर मिळतात.

उदा. **s (s+3)(s+4) = 0**

म्हणून, **Poles = S = 0, S = -3, S = -4**

Zeros (झिरोज): झिरोज हे समीकरणाच्या त्या मूळसंख्या आहेत ज्या न्यूमरेटर (Numerator) ला **'0'** समकक्ष (equal) ठेवल्यावर मिळतात.

उदा. **(s+2)(s+5) = 0**

Characteristic Equation (कॅरॅक्टॅरिस्टिक इक्वेशन): हे डिनॉमिनेटर (Denominator) ला **'0'** समकक्ष (equal) ठेवल्यावर मिळते.

उदा. **s (s+3)(s+4) = 0**

$(s^2 + 3s)(s + 4) = 0$

$s^3 + 3s^2 + 4s^2 + 12s = 0$

⇒ **$s^3 + 7s^2 + 12s = 0$** हे कॅरॅक्टॅरिस्टिक इक्वेशन (Characteristic Equation) आहे.



Fig.2.5

पोल – जीरो प्लॉट

(Pole – Zero Plot)

2.2 स्टँडर्ड टेस्ट इनपुट्स (सिग्नल) Standard Test Inputs (Signals): एका सिस्टिमचा रिस्पॉन्स (Response) जाणून घेण्यासाठी इनपुट सिग्नल (Input Signal) ची माहिती असणे आवश्यक आहे. कोणतीही नवीन सिस्टिम (System) प्रथम वेगवेगळ्या इनपुट सिग्नल्स (Input Signals) सोबत तपासली जाते आणि त्या इनपुट्सला दिलेला रिस्पॉन्स (Response) पाहिला जातो. सिस्टिमचे मूल्यमापन, या इनपुट्स (Inputs) ला दिलेल्या रिस्पॉन्स (Response) वर आधारित केले जाते. हे इनपुट्स स्टँडर्ड टेस्ट इनपुट्स (Standard Test Inputs) म्हणून ओळखले जातात.

एकदा सिस्टिमने टेस्ट इनपुट्स (Test Inputs) साठी समाधानकारक वर्तन (Behavior) दाखवले की, त्यानंतरच ती प्रत्यक्ष वापरात आणली जाते.



Fig.2.6

टाईप्स ऑफ स्टँडर्ड टेस्ट इनपुट्स (सिग्नल)

Types of Standard Test Inputs (Signals)

2.2.1 स्टेप सिग्नल (Step Signal) (पोजीशन फंक्शन - Position Function): स्टेप सिग्नल (Step Signal) हा असा सिग्नल (Signal) आहे, ज्याचे मूल्य ‘0’ वेळेत ($t = 0$) एका पातळीवरून (साधारणतः ‘0’ वरून) दुसऱ्या पातळीवर A पर्यंत बदलते आणि $t > 0$ साठी A वर स्थिर राहते.

युनिट स्टेप (Unit Step) हा स्टेप सिग्नल (Step Signal) चाच एक विशेष प्रकार आहे, ज्यामध्ये A चे मूल्य 1 (Unity) असते. स्टेप सिग्नलचे मॅथेमॅटिकल रीप्रेजेंटेशन (Mathematical Representation):

r(t) = A * u(t)

जेथे, u(t) = 0; t < 0

= 1; t ≥ 0

लाप्लास ट्रान्सफॉर्म (Laplace Transform) मध्ये:

$$L\{r(t)\} = R(s) = \frac{A}{s}$$



Fig.2.7

ग्राफिकल रीप्रेजेंटेशन ऑफ स्टेप सिग्नल

(Graphical Representation of Step Signal)

2.2.2 रॅम्प सिग्नल (Ramp Signal) (वेग फंक्शन - Velocity Function): रॅम्प सिग्नल (Ramp Signal) हा असा सिग्नल (Signal) आहे, जो 0 पासून सुरू होतो आणि वेळेसोबत रेषीय (linearly) वाढत जातो.

रॅम्प सिग्नल (Ramp Signal) हा प्रणालीस दिलेल्या स्थिर वेगाच्या इनपुटसारखा असतो. युनिट रॅम्प सिग्नल (Unit Ramp Signal) हा विशेष प्रकार आहे, ज्यामध्ये A चे मूल्य 1 (Unity) असते.

रॅम्प सिग्नलचे मॅथेमॅटिकल रीप्रेजेंटेशन (Mathematical Representation):

r(t) = 0 ; t < 0

= A * t ; t ≥ 0

लाप्लास ट्रान्सफॉर्म (Laplace Transform) मध्ये:

$$L\{r(t)\} = R(s) = \frac{A}{s^2}$$



Fig.2.8

ग्राफिकल रीप्रेजेंटेशन ऑफ रॅम्प सिग्नल

(Graphical Representation of Ramp Signal)

2.2.3 पॅराबोलिक सिग्नल (Parabolic Signal) (त्वरण फंक्शन - Acceleration Function): पॅराबोलिक सिग्नल (Parabolic Signal) मध्ये तत्काळ मूल्य (Instantaneous Value) वेळेच्या वर्ग (Square) प्रमाणे बदलते आणि **t** = 0 वर प्रारंभिक मूल्य 0 असते. याचा ग्राफिकल (Graphical) प्रतिनिधित्व पॅराबोलासारखा दिसतो. पॅराबोलिक सिग्नल (Parabolic Signal) हा प्रणालीस दिलेल्या स्थिर त्वरणाच्या (Constant Acceleration) इनपुटसारखा असतो.

पॅराबोलिक सिग्नलचे मॅथेमॅटिकल रीप्रेजेंटेशन (Mathematical Representation):

$$r(t) = 0 \; ; \; t < 0$$
$$= (A * t^2) / 2 \; ; \; t \geq 0$$

लाप्लास ट्रान्सफॉर्म (Laplace Transform) मध्ये:

$$L\{r(t)\} = R(s) = \frac{A}{s^3}$$



Fig.2.9
ग्राफिकल रीप्रेजेंटेशन ऑफ पॅराबोलिक सिग्नल
(Graphical Representation of Parabolic Signal)

2.2.4 इम्पल्स सिग्नल (Impulse Signal) (जर्क फंक्शन - Jerk Function): इम्पल्स इनपुट सिग्नल (Impulse Input Signal) हा अतिशय कमी वेळेसाठी (Short Duration) आणि खूप मोठ्या ऍम्प्लिट्यूडचा (Very High Amplitude) असतो. हा सिग्नल तत्काळ (Instantly) लागू केला जातो. t = 0 वगळता कोणत्याही क्षणी (Instant) हा सिग्नल 0 असतो. t = 0 वर त्याची किंमत (infinity) होते. या सिग्नलचा क्षेत्रफळ (Area) म्हणजे त्याचे ऍम्प्लिट्यूड (Amplitude) असते. याला डेल्टा फंक्शन (δ-Function) असे म्हणतात आणि δ(t) ने दर्शवले जाते.

इम्पल्स सिग्नलचे मॅथेमॅटिकल रीप्रेजेंटेशन (Mathematical Representation):

$$\delta(t) = \infty; t = 0$$
$$= 0; \; t \neq 0$$
$$\int_{-\infty}^{+\infty} \delta(t)dt = A$$

In the form of लाप्लास ट्रान्सफॉर्म (Laplace transform),

$$L\{\delta(t)\} = R(s) = 1$$



Fig.2.10
ग्राफिकल रीप्रेजेंटेशन ऑफ इम्पल्स सिग्नल
(Graphical Representation of Impulse Signal)

Table 2.1
स्टँडर्ड टेस्ट इनपुट्स (सिग्नलस)
Standard Test Input (Signals)

Name of the Signal	Time domain equation of signal, r(t)	Laplace Transform of the signal, R(s)
Step	A	$\frac{A}{s}$
Unit Step	1	$\frac{1}{s}$
Ramp	At	$\frac{A}{s^2}$
Unit Ramp	T	$\frac{1}{s^2}$
Parabolic	$\frac{At^2}{2}$	$\frac{A}{s^3}$
Unit Parabolic	$\frac{t^2}{2}$	$\frac{1}{s^3}$
Impulse	δ (t)	1

Table 2.2

स्टँडर्ड टेस्ट इनपुट्स (सिग्नलस)

Comparison of all types of Standard Test Signals

Parameter/ Input Signals	Step input	Ramp input	Parabolic	Impulse
r (t)	$A \cdot u(t)$	$A \cdot t$	$\left(\frac{A}{2}\right) \cdot t^2$	A
R (s)	$\frac{A}{s}$	$\frac{A}{s^2}$	$\frac{A}{s^3}$	1
Type of function	Position	Velocity	Acceleration	Short time pulse
Figure				

2.3 फर्स्ट-ऑर्डर सिस्टिम (First Order System): युनिट स्टेप इनपुटसाठी विश्लेषण (Analysis for Unit Step Input). फर्स्ट-ऑर्डर सिस्टिममध्ये झिरो (Zero) नसल्यास त्याचे ट्रान्सफर फंक्शन (Transfer Function) फिगर 2.3.1(a) मध्ये दाखवले आहे. जर इनपुट युनिट स्टेप असेल, जिथे $R(s) = 1/s$ असेल, तर स्टेप रिस्पॉन्सचा (Step Response) लाप्लास ट्रान्सफॉर्म (Laplace Transform) C(s) असेल.

Where $C(s) = R(s)G(s) = \frac{a}{s(s+a)}$



Fig.2.11

a. फर्स्ट-ऑर्डर सिस्टिम b. पोल प्लॉट

a. First-order system; b. pole plot

फर्स्ट-ऑर्डर सिस्टिम (First Order System) हा असा डायनामिक सिस्टिम आहे ज्याचे वर्तन फर्स्ट-ऑर्डर लीनियर डिफरेंशिअल इक्वेशनद्वारे नियंत्रित होते. हे सिस्टिम्स सहसा अशा भौतिक प्रणालींचे मॉडेलिंग करण्यासाठी वापरले जातात ज्या घसरत्या (exponential) प्रतिसाद (response) दर्शवतात, जसे की रेझिस्टर आणि कॅपेसिटर असलेले इलेक्ट्रिकल सर्किट्स किंवा डॅम्पर आणि मासेस असलेली मेकॅनिकल सिस्टिम्स.

2.3.1 फर्स्ट-ऑर्डर सिस्टिमचा वेळ प्रतिसाद (Time Response of the First Order System): खाली दिलेल्या ब्लॉक डायग्राममध्ये क्लोज्ड-लूप कंट्रोल सिस्टिम (Closed Loop Control System) दर्शवली आहे. येथे, ओपन-लूप ट्रान्सफर फंक्शन (Open Loop Transfer Function) 1/sT युनिटी निगेटिव्ह फीडबॅक (Unity Negative Feedback) सोबत जोडलेले आहे.



Fig.2.12
ब्लॉक डायग्राम ऑफ फर्स्ट-ऑर्डर सिस्टिम
(Block diagram of a first order system)

आपण जाणतो की युनिटी निगेटिव्ह फीडबॅक असलेल्या क्लोज्ड-लूप कंट्रोल सिस्टिमचे ट्रान्सफर फंक्शन खालीलप्रमाणे आहे

$$\frac{C(s)}{R(s)} = \frac{G(s)}{1 + G(s)}$$

Substitute, $G(s) = \frac{1}{sT}$ in the above equation.

$$\frac{C(s)}{R(s)} = \frac{\frac{1}{sT}}{1 + \frac{1}{sT}} = \frac{1}{sT + 1}$$

's' चा घात (power) हरिणारी संज्ञा (denominator term) मध्ये 1 आहे. त्यामुळे वरील ट्रान्सफर फंक्शन फर्स्ट-ऑर्डर (first-order) आहे आणि हा सिस्टम फर्स्ट-ऑर्डर सिस्टिम म्हणून ओळखला जातो.
आपण वरील समीकरण पुन्हा लिहू शकतो:

$$C(s) = \left(\frac{1}{sT + 1}\right) R(s)$$

जेथे, C(s) हे C(t) या आउटपुट सिग्नलचे लाप्लास ट्रान्सफॉर्म आहे, R(s) हे r(t) या इनपुट सिग्नलचे लाप्लास ट्रान्सफॉर्म आहे,आणि T हा टाइम कॉन्स्टंट आहे.
फर्स्ट-ऑर्डर सिस्टिमचा टाइम डोमेन (time domain) मधील रिस्पॉन्स (आउटपुट) मिळवण्यासाठी खालील स्टेप्स फॉलो करा:

1. इनपुट सिग्नल r(t) चा लाप्लास ट्रान्सफॉर्म घ्या.
2. समीकरण विचारात घ्या,

$$C(s) = \left(\frac{1}{sT + 1}\right) R(s)$$

3. वरील समीकरणात R(s) चे मूल्य टाका.
4. आवश्यक असल्यास, C(s) चे पार्शल फ्रॅक्शन (partial fraction) करा.
5. C(s) वर इन्व्हर्स लाप्लास ट्रान्सफॉर्म (inverse Laplace transform) लागू करा.

यापूर्वी आपण इम्पल्स (impulse), स्टेप (step), रॅम्प (ramp), आणि पॅराबोलिक (parabolic) हे स्टँडर्ड टेस्ट सिग्नल्स पाहिले आहेत. आता आपण फर्स्ट-ऑर्डर सिस्टिमचा स्टेप इनपुट साठीचा रिस्पॉन्स शोधूया. इनपुट सिग्नलच्या नावानुसार रिस्पॉन्सचे नाव दिले जाते. उदाहरणार्थ, जर इनपुट स्टेप सिग्नल असेल, तर त्या सिस्टिमचा रिस्पॉन्स स्टेप रिस्पॉन्स म्हणून ओळखला जातो.

2.3.2 स्टेप रिस्पॉन्स ऑफ फर्स्ट-ऑर्डर सिस्टिम (Step Response of First Order System):

Consider the unit step signal as an input to first order system.

So, r(t)=u(t)

लाप्लास ट्रान्सफॉर्म (Laplace transform) दोन्ही बाजूस करा.

$$R(s) = \frac{1}{s}$$

Consider the equation,

$$C(s) = \left(\frac{1}{sT+1}\right) R(s)$$

Substitute, $R(s) = \frac{1}{s}$ in the above equation

$$C(s) = \left(\frac{1}{sT+1}\right) \frac{1}{s} = \frac{1}{s(sT+1)}$$

Do partial fraction of C(s),

